# KOLHAPUR ENGINEERING ASSOCIATION

केंद्र आणि राज्यशासनाने दिलेल्या आदेशानुसार दि.22 मार्च 2020 पासून लॉकडाउन मुळे शहरातील शिवाजी उद्यमनगर, वाय.पी.पोवार आणि पांजरपोळ या औद्योगिक वसाहती पुर्ण पणे बंद होत्या.

राज्य शासनाने दिनांक 20 एप्रिल पासून राज्यातील विविध जिल्ह्यातील उद्योग-व्यापार सुरू करण्यासंदर्भात मार्गदर्शक तत्वांचा आदेश काढल्याच्या पार्श्वभूमीवर कोल्हापुरातील उद्योग-व्यापार संघटनांच्या प्रतिनिधींनी आज दिनांक 18 एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात मा पालक मंत्री ना श्री सतेज उर्फ बंटी पाटील साहेब , आमदार श्री चंद्रकांत जाधव , जिल्हाधिकारी मा.दौलत देसाई, महापालिका आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक श्री सतीश शेळके, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी श्री धनाजी इंगळे , जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अमन मित्तल यांची भेट घेऊन चर्चा केली. या वेळी झालेल्या चर्चेतील मुद्दे खालील प्रमाणे आहेत. 1) मा.पालक मंत्री आणि मा जिल्हाधिकारी यांनी सर्व औद्योगिक व व्यापारी असोसिएशनच्या प्रतिनिधींना आवाहन केले की, शक्यतो दि.3 मे पर्यंत उद्योग-व्यापार बंद ठेवून प्रशासनाला सहकार्य करावे. 2) ज्या उद्योजकांना उद्योग सुरू करायचे असतील त्या उद्योजकांनी कारखाना सुरू करीत असताना त्यांच्या कामगारांची राहण्याची व खाण्याची व्यवस्था कारखान्यात करता येत असेल तर त्याला प्राधान्य द्यावे असे सुद्धा आव्हान केले. 3) कारखाना सुरू करण्याची मार्गदर्शक तत्त्वे व आदेश याचा उद्योजक व्यापाऱ्यांनी पूर्ण अभ्यास करून एमआयडीसीमधील कारखानदारांनी एमआयडीसीच्या संकेत स्थळावर http://permission.midcindia.org/ येथे अर्ज करून परवानगी घेऊनच दिनांक 20 एप्रिल पासून उद्योग सुरू करता येतील. 4) महानगरपालिका व नगरपालिका हद्दीतील उद्योग आणि व्यापार सुरु करण्यास सध्यातरी परवानगी नाही असे मा जिल्हाधिकारी साहेब यांनी सांगितले. यावेळी सर्वश्री आमदार चंद्रकांत जाधव, सचिन शिरगावकर, रणजीत शाह, अतुल पाटील, संजय शेटे, गोरख माळी, विज्ञान मुंडे, संजय पाटील, चंद्रकांत सूर्यवंशी, प्रदीप व्हरांबळे इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.